# कृषि परिषदेची उद्दीष्टे, ध्येय :

महाराष्ट्रात एकूण ४ कृषि विद्यापीठे असून, चार कृषि विद्यापीठामध्ये प्रभावी समन्वय व सुसूत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठ कायदा १९८३ कलम १२ नुसार महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेची (जिचा उल्लेख यापुढे कृषी परिषद असा केला आहे)स्थापना करण्यात आली. कृषि विद्यापीठांच्या कार्याचा आढावा घेणे, मूल्यमापन करणे आणि पर्यवेक्षण व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी उक्त कायद्यान्वये कृषी परिषदेवर सोपविण्यात आलेली आहे. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद दिनांक १०.०९.१९८४ रोजी अस्तित्वात आली असून कृषी परिषदेचे मुख्यालय पुणे येथे आहे.

१ राज्यातील कृषी विद्यापीठाच्या वार्षिक योजना व अशा योजनांचे भाग असणाऱ्या योजनांना मान्यता देणे.

२ महाराष्ट्र कृषि विद्यापीठ कायदा, १९८३ चे कलम ५४ च्या उपबंधाच्या अधिन राहून विद्यापीठाच्या वार्षिक वित्तीय अंदाजपत्रकांना मान्यता देणे व शासनाकडे शिफारस करणे.

३ अर्थसंकल्पीय अनुदानाचे पुनर्विनियोजन करण्यासाठी विद्यापीठाने मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देणे.

४ कोणत्याही नवीन विद्याशाखा, पाठक्रम किंवा ज्ञानशाखा किंवा विभाग सुरु करण्यासाठी त्याचप्रमाणे कोणत्याही अभ्यासक्रमासाठी जादा वैकल्पिक विषय सुरु करण्याकरितां विद्यापीठांना परवानगी देणे.

५ कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्याच्यावरील अंदाजित खर्च रु.३.०० लाख किंवा त्याहून अधिक आहे, अशा कोणत्याही इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देणे.

६ कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्यावरील अंदाजित खर्च रु.५.०० लाख किंवा त्याहून अधिक अशा यंत्रसामुग्रीच्या खर्चास मान्यता देणे.

७ विद्यापीठाच्या कार्यात प्रभावी समन्वय घडवून आणण्याच्या आणि त्यांना योग्य मार्गर्दान व निर्देशन करण्याच्या दृष्टीने कृषि, उद्यानविद्या, वनशास्त्र, फलोत्पादन, अन्नतंत्रज्ञान, कृषि अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, गृहविज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन यांच्याशी संबधित असलेली कामे धरून कृषि शिक्षण, अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांच्या संदर्भात विद्यापीठामध्ये पार पाडण्यात आलेल्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

८ कृषि विद्यापीठांच्या नियतकालिक मूल्यमापनाच्या संदर्भात विद्यापीठांच्या कामकाजाविषयी कुलपतींना माहिती देणे.

९ कृषि परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर विद्यापीठास योजनेअंतर्गत व योजनेतर असे दोन्ही प्रकारचे निधी आवश्यक वाटेल, अशा कालांतराने देण्याविषयी राज्य शासनास शिफारस करणे.

१० राज्य शासनाव्दारे निर्दिष्ट केल्या जातील अशा विद्यापीठाच्या कार्याशी संबंधित कोणत्याही बाबीविषयी राज्य शासनास सल्ला देणे.

११ या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी अनुषंगिक व आवश्यक असेल, अशा इतर अधिकाराचा वापर करणे व अशी कामे पार पाडणे.

१२ प्राध्यापक व त्यावरील पदांच्या नेमणुका व पदोन्नत्या करणे

| अ.क्र | विद्यापीठाचे नांव | विद्यापीठाचे कार्यक्षेत्र | विद्यापीठाच्या स्थापनेचे वर्ष |
|---|---|---|---|
| १ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नााशिक, अहमदनगर, धुळे, नंदूरबार आणि जळगांव | १९६९ |
| २ | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | अमरावती,यवतमाळ वर्धा, अकोला, बुलडाणा, वाशिम, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया | १९७० |
| ३ | मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद, | १९७२ |
| ४ | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी | ठाणे, मुंबई उपनगरे, मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग. | १९७२ |